**ePaper** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना आराम करण्याचा डॉक्टरांचा सल्ला!



| वर्ष - 7 | अंक - 218 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- इंग्लडचा अवघ्या 136 धावांत खुर्दा
- साहिल खानला पोलिसांचे समन्स
- मशिदीच्या सर्वेक्षणास स्थगिती नाहीच
- अपात्रतेचा निर्णय आणखी लांबणीवर

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 16 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवडमधील ‘टीडीआर’ घोटाळा

# ‘खतरों के खिलाडी’ मात्र चिडीचूप!

## शहरातील भ्रष्टाचार विधीमंडळ अधिवेशनात

| पिंपरी |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड शहरात काँग्रेसचा एकही आमदार नाही. २०१७ च्या निवडणुकीत साधा एक नगरसेवकसुद्धा निवडून आला नाही. तरीही काँगेसचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्याच्या विधीमंडळ सभागृहात शहरातील ‘टीडीआर’ घोटाळ्याची चिरफाड केली. आयुक्तांपासून अधिकारी-नेते-पदाधिकारी यांचे अक्षरश: नाक दाबले. आशिया खंडातील सर्वात श्रीमंत, प्रगतीशील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषेत ‘फ्युचर सिटी’ असा लौकीक असलेल्या पिंपरी-चिंचवडीची अब्रु हिवाळी अधिवेशनात चव्हाट्यावर आली. पण, भ्रष्टाचाराचे कर्दनकाळ, विठ्ठल-रुक्मीनी मूर्तीपासून अगदी मास्क खरेदीपर्यंत ‘खतरों के खिलाडी’ असलेले माजी नगरसेवक, दबंग पदाधिकारी चिडीचूप कसे बसले? असा प्रश्न पिंपरी-चिंचवडकरांना सतावत आहे..**



### स्थानिक नेते, पदाधिकारी, अधिकाऱ्यांची ‘विकेट’

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील डोळे पांढरे होतील, असा कोट्यवधी रुपयांचा ‘टीडीआर’ घोटाळा विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी नागपूर अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर बोलताना चव्हाट्यावर आणला. “सरकारची नियत साफ असेल तर त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधीतावर कारवाई करावी” अशी मागणीही त्यांनी केली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडकर खडबडून जागे झाले.

पारदर्शी, पथदर्शी आणि गतीमान विकासाचे स्वप्न दाखवून २०१७ मध्ये सत्तेत आलेला भारतीय जनता पक्ष आता राज्याच्या सत्तेत आहे. महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे. त्यामुळे राज्यात सत्तेत असलेल्या भाजपाचा ‘वचक’ निश्चितच असेल, असे म्हणायला हरकत नाही. असे असतानाही मे. विलास जावडेकर इन्फिनिटी प्रा.लि. या संस्थेने महानगरपालिकेसोबत ६ नोव्हेंबर २०२३ रोजी एक करार केला. त्यानुसार वाकडमधील भूखंडाच्या बदल्यात टीडीआर देण्यात आला. त्यामुळे तब्बल ६७१ कोटी रुपयांचा फायदा भूखंडमालक कंपनीचा होणार आहे.

ही ‘डील’ अत्यंत जलदगतीने करण्यात आली. पण स्थानिक नेते, पदाधिकारी कुणीही चर्चा केली नाही. साधे महापालिका आयुक्तांना पत्रही काढले नाही. ‘इतना सन्नाटा क्यों भाई...’ असे म्हणण्याची वेळ आली.

शहरात भाजपाचे तीन आमदार आहे. आमदार महेश लांडगे, आमदार अश्विनी जगताप, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे यांनी अधिवेशनाच्या निमित्ताने नागपूरात ठाण मांडले आहे. दुसरी, महायुतीत सत्ताधारी पक्ष राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे आहेत. त्यांनाही ‘टीडीआर’ घोटाळ्यावर बोलता आले नाही. एव्हढेच काय, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार शहराचे ‘कारभारी’ आहेत. त्यांनाही या मुद्यावर बोलता आले नाही किंवा स्थानिक नेत्यांनी त्यांना तसे सूचवले नाही. याचे आश्चर्य वाटते. दुसरीकडे, भ्रष्टाचाराच्या मुद्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सत्ताकाळात गुडघ्यावर आणणाऱ्या स्थायी समितीच्या माजी सभापती सीमा सावळे असो किंवा पिंपरी-चिंचवडकरांच्या हितासाठी लढणारे सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर असोत... कुणीही टीडीआर घोटाळ्यावर बोलले नाहीत. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनीही ‘शोध पत्रकारिता’ केली नाही. ‘टीडीआर’ धंद्यामध्ये स्थिर-स्थावर झालेले आजी-माजी नगरसेवक, महापौर, पदाधिकारी यांनाही बोलता आले नाही. कारण काय? तर प्रत्येकाची अडचण आहे... प्रत्येकाचे हात दगडाखाली आहेत. सगळे ‘खतरों के खिलाडी’ अगदी ‘सरेंडर’ झाले. कारण, प्रत्येकाला ‘टीडीआर’ आणि त्यातून मिळणारी बक्कळ कमाई यांची कल्पना आहे. पण, या सर्व प्रकरणामुळे शहराच्या नावाचा पुन्हा एकदा उद्धार झाला, हे मान्य करायला हवे.




### सिंग इज किंग अल्सो...

“टीडीआर घोटाळ्यामध्ये महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि संबंधित १० ते १२ अधिकारी घरी जावू शकतात” असा दावा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. त्यावर मनपा प्रशासनाने खुलासा केला. सर्व टीडीआर प्रक्रिया नियमानुसारच झाली आहे. त्या ठिकाणी २१ मजली व्यावसायिक इमारत उभारण्यात येणार आहे. त्यामुळे महापालिकेला उत्पन्नात वाढ होणार आहे, असा दावा करण्यात आला. वास्तविक, शेखर सिंह उच्च विद्याविभूषित अधिकारी आहेत. आणखी सुमारे २५ वर्षे त्यांना करिअर करायचे आहे. त्यामुळे टीडीआर सारख्या विषयात ते ‘रिस्क’ घेतील असे वाटत नाही. जमीन मालकांनी ५० टक्के जागा व त्यावर २० टक्के बांधीव क्षेत्र महापालिकेस हस्तांतरित करुन देण्याची तरतूद आहे. समावेशक आरक्षण माध्यमातून आरक्षण विकसित झाल्यास भूसंपादनाचा व बांधकामाचा खर्च करावा लागत नाही. त्या बदलल्यात महापालिकेस हस्तांतरित केलेल्या क्षेत्राचा व बांधकामांचा जागामालकांना टीडीआर देण्याची तरतूद आहे, असे नियमांच्या चौकटीतील उत्तर आयुक्तांनी प्रसारमाध्यमांना दिली. त्यामुळे जागा मालकाला क्लिन चिट मिळाली. याउलट, जर आयुक्तांनी हा निर्णय मागे घेतला किंवा स्थगिती दिली. तर जागा मालक न्यायालयीन लढाई करणार हे निश्चित आहे. ती प्रशासनाच्या अंगलट येणार आहे. त्यामुळे ‘सिंग इज किंग’ या उक्तीप्रमाणे टीडीआर घोटाळा केवळ चार दिवसांची चर्चा असेल, यात शंका नाही.

# सोसायटीधारकांच्या आव्हानांवर 'मंथन'!

## सोसायटी फेडरेशनचे स्नेहसंमेलन : अध्यक्ष संजीवन सांगळे यांची माहिती

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात सहा हजाराहून अधिक सहकारी गृह रचना संस्था आहेत. या सर्व सहकारी गृह रचना संस्थांना अनेक अडचणींना, समस्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व आव्हानांबाबत साधक-बाधक चर्चा करण्यासाठी तसेच सोसायटी फेडरेशनची सोसायट्यांसमोरील आव्हान, समस्या बाबत फेडरेशनची असणारी भविष्यातील भूमिका याबाबत फेडरेशन मार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सोसायटीधारकांना एकसंघ करून सर्व सोसायटी धारकांच्या ऐक्यासाठी भविष्यामध्ये मार्गक्रमण करत असताना करावयाच्या नियोजनाबाबत सदर महास्नेहसंमेलन मेळाव्यामध्ये चर्चा आणि दिशा ठरवण्यात येणार आहे, अशी माहिती चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी दिली.**



चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून येत्या शनिवारी, दि. 16 डिसेंबर रोजी, साधुराम गार्डन मंगल कार्यालय, नाशिक- पुणे हवे, साईनाथ हॉस्पिटल समोर मोशी या ठिकाणी सायंकाळी 6 ते 10 या वेळेत पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व सोसाट्यांमधील सर्व सदस्यांसाठी महास्नेहसंमेलन आयोजित केलेले आहे.

संजीवन सांगळे म्हणाले की, सदर महास्नेहसंमेलन हे सर्व सोसाट्यांमधील सर्व सदस्यांसाठी त्यामध्ये लहान मुले, महिला भगिनी, ज्येष्ठ सदस्य,इतर सर्व सदस्य या सर्वांसाठी हे स्नेहसंमेलन असणार आहे. सदर महास्नेहसंमेलनामध्ये सर्व सदस्यांसाठी करमणूक म्हणून गाण्यांचा कार्यक्रम आर्केस्ट्रा ठेवण्यात आलेला आहे लहान मुलांसाठी खेळण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. सर्व उपस्थित सदस्यांसाठी रुचकर आणि स्वादिष्ट जेवणाची व्यवस्था केलेली आहे.

तसेच सदर महास्नेहसंमेलनासाठी उपस्थित असणाऱ्या सोसायटी धारकांच्या विविध समस्या मांडण्यासाठी एक ड्रॉप बॉक्स या ठिकाणी ठेवण्यात आलेला आहे. यामध्ये परिसरातील सदस्य आपल्या भागातील अडी अडचणी समस्या ठेवू शकतात. यावर या महास्नेहसंमेलनानंतर पाठपुरावा करून या सर्व समस्या सोडवल्या जातील..

तरी पिंपरी चिंचवड शहरातील सर्वच सोसायटीमधील सर्व सदस्यांनी सदर फेडरेशनच्या महास्नेहसंमेलनास उपस्थित राहावे. असे फेडरेशन कडून आव्हान करण्यात येत आहे.

> सर्व सोसायटीधारकांना एकत्र करून एका छताखाली आणणे. सर्वांना एकत्र करून आपल्या सर्वांच्या समोर असणारी अनेक आव्हाने अडचणी,समस्या याबाबत सर्वांना मार्गदर्शन आणि आपल्या फेडरेशनची भविष्यात असणारी भूमिका या महा स्नेहसंमेलनात जाहीर केली जाणार आहे. सर्व सोसायट्यांमधील सर्व सदस्यांना सहकुटुंब सहपरिवार एकत्र आणून विचाराची देवाण-घेवाण आणि सहपरिवार आनंद साजरा करणे हा या महासंमेलनाचा उद्देश आहे. तरी माझी पिंपरी चिंचवड शहरातील सर्व सोसायटीधारकांना विनंती आहे आपल्या सर्वांच्या ऐक्यासाठी, आपल्या सर्वांच्या भविष्यासाठी आपण सर्वांनी या महास्नेहसम्मेलनास कुटुंब सह परिवार उपस्थित रहावे.
>
> – **संजीवन सांगळे**
> अध्यक्ष चिखली – मोशी -पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन..

---

# पुण्यात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आमने-सामने

## राष्ट्रवादीच्या जगताप यांचा पुणे लोकसभेवर दावा

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पोटनिवडणुकीत पुणे लोकसभा मतदारसंघ कोणाचा, या मुद्द्यावरून काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आमने-सामने येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोटनिवडणूक असो किंवा सार्वत्रिक निवडणूक पुण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आग्रही आहे, अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसने घेतली आहे. मात्र पुणे लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा पारंपरिक मतदारसंघ आहे. त्यामुळे तो सोडण्याचा प्रश्नच नाही, असे काँग्रेसकडून जाहीर करण्यात आले आहे.**




पुणे लोकसभेची पोटनिवडणूक तातडीने घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. मात्र, लोकसभेची मुदत अवघ्या काही महिन्यात संपुष्टात येणार असल्याने पोटनिवडणूक होईल, याबाबत संभ्रमावस्था आहे. मात्र पोटनिवडणूक होईल, या शक्यतेने सर्वच राजकीय पक्षांनी तयारी आणि उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पुणे लोकसभेवर दावा केला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीमध्ये पुणे लोकसभा मतदारसंघ कायम काँग्रेसकडे राहिला आहे. गेली निवडणूकही काँग्रेसनेच लढविली होती. मात्र खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर काही दिवसांतच पोटनिवडणुकीची चर्चा सुरू झाली. महाविकास आघाडीत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे लोकसभा मतदारसंघावर दावा केला होता. आघाडीत ज्याची जास्त ताकद तो मतदारसंघ त्या पक्षाचा असेल, अशी स्पष्ट भूमिका पवार यांनी घेतली होती. त्यानंतर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद सुरू झाले होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून तसे जाहीर फलकही उभारण्यात आले होते. मात्र पोटनिवडणूक होणार नाही, हे लक्षात येताच मतदारसंघ कोणाचा हा मुद्दाही मागे पडला. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे पुन्हा हा मुद्दा चर्चेत आला असून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने या मतदारसंघावर दावा केला आहे. राज्यातील सत्ता समीकरण गेल्या काही महिन्यांत बदलली. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. अजित पवार त्यांच्या समर्थक आमदारांसह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये दाखल झाले. त्यामुळे अजित पवार गट पुण्याची पोटनिवडणूक लढविण्याची शक्यता कमीच आहे. सध्या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरे यांची महाविकास आघाडी कायम आहे. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेसने दावा केल्याने महाविकास आघाडीत वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

### पोटनिवडणुकीसाठी यांची नावे चर्चेत

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागणीनंतर काँग्रेसकडून आकडेवारीसह या जागेवर यापूर्वीच दावा करण्यात आला आहे. पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसकडून माजी आमदार मोहन जोशी आणि अनंत गाडगीळ; तसेच प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांची नावे चर्चेत आहेत. कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपला बालेकिल्ल्यातच पराभूत करणारे आमदार रवींद्र धंगेकर यांनीही लोकसभा निवडणूक लढविण्याची जाहीर इच्छा व्यक्त केली आहे.**

# मराठा आरक्षण : 60 वर्षे सत्तेत असलेल्या नेत्यांनी काय केले?

। नागपूर ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर बोलले जाते. न्यायालयात टिकेल असे आरक्षण देवू अशी छत्रपती शिवाजी महाराज यांची जाहिरपणे शपथ घेणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवरही टीका केली जात आहे. मग, ६० वर्षे सत्तेत असलेल्या नेत्यांनी काय केले? असा सडेतोड सवाल आमदार महेश लांडगे यांनी उपस्थित केला.**

मराठा आरक्षणाच्या मुद्यावर नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने राज्याच्या विधिमंडळ सभागृहात सविस्तर चर्चा झाली.



यावेळी आपली भूमिका मांडताना आमदार लांडगे यांनी मराठा, ओबीसी आणि अन्य समाजाच्या नेत्यांना अक्षरश: आत्मचिंतन करायला लावणारी भूमिका मांडली

आमदार लांडगे म्हणाले की, मराठा समाजाला शिक्षणासाठी, नोकरीसाठी आरक्षणाची गरज आहे. या मुद्यावरुन राजकारण केल्याने समाज उद्ध्वस्थ झाला आहे. समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांना रोखले पाहिजे. मराठा आणि ओबीसी अशी दरी निर्माण झाली आहे. माझे सर्व सामाजातील मित्र आहे. आम्हाला कधीही जातीचा अडसर आला नाही. पण, काही अदृश्य शक्तींनी समाजात वाद निर्माण केला. "मी ज्या शहराचे प्रतिनिधित्व करतो त्या पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी मराठा समाजाच्या भूमिपुत्रांच्या जमिनी शासनाने संपादित केल्या. त्या ठिकाणी मोठे प्रकल्प, एमआयडीसी उभारल्या.

त्याच प्रकल्पांसमोर भूमिहीन झालेल्या मराठा समाजाला पानाच्या टपऱ्या लावाव्या लागत आहेत. कारण, मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत आरक्षण नाही. त्यामुळे शिक्षण मिळाले नाही. ज्यांना शिक्षण मिळाले. त्यामध्ये शिपाईपदाच्या भरतीसाठी मराठा समाजातील एमई झालेला तरुण रांगेत उभा असतो, ही शोकांतिका समजून घेतली पाहिजे, असा घणाघाती आमदार लांडगे यांनी केला.

## अनुकंपा पद्धती का रद्द केली?

» महाविकास आघाडी सरकारच्या काळात शासकीय नोकरीमध्ये मराठा सजातील वर्ग-३ आणि ४ साठी अनुकंपापद्धती का बंद केली? गेल्या ६० वर्षात आरक्षणाचा विषय का मार्गी लागला नाही? असा सवालही आमदार लांडगे यांनी सभागृहात उपस्थित केला. जातीय तेढ निर्माण करण्यापेक्षा मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सर्वपक्षीय नेत्यांनी आत्मचिंतन करावे आणि देव...देश...अन् धर्म रक्षणाचा वारसा सांगणाऱ्या मराठा समाजाला न्याय द्यावा, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली.

## » नागपूर हिवाळी अधिवेशन : आमदार महेश लांडगे यांचा सडेतोड सवाल

### बोलण्याच्या संधीसाठी तीन दिवसांची प्रतिक्षा...

» मराठा आरक्षण मुद्यावर आमदार लांडगे यांनी लक्षवेधी सूचना केली होती. मात्र, यासंदर्भात बोलण्यासाठी तीन दिवस प्रतिक्षा करावी लागली. गुरुवारी रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास सभागृहात बोलण्यासाठी ते उभा राहिले. त्यावेळी सभापतींनी थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, लांडगे यांनी थेट सभापतींनाच खडेबोल सुनावले. "आम्हीही बोलू शकतो... आम्ही केवळ ऐकायला आलो नाही..." असा संताप केला. त्यानंतर सभापतींनी त्यांना बोलण्याची संधी दिली. मराठा आरक्षणावर तब्बल २३ मिनिटे आमदार लांडगे यांनी मुद्देसुद भूमिका मांडली. सभागृहात अनेक सदस्यांनी याच मुद्यावर आरोप-प्रत्यारोप अशी भाषणे केली. मात्र, आमदार लांडगे यांनी सर्वपक्षीय नेत्यांच्या डोळ्यांत अंजन घातले आणि मराठा आरक्षण हा मुद्दा राजकीय नसून, गरजवंत मराठ्यांच्या हक्काचा लढा आहे... असे ठणकावून सांगितले.

> ओबीसींचे आरक्षण कमी करुन मराठा समाजाला द्यावे, असे सत्ताधारी पक्षातील कोणत्याही नेत्यांनी म्हटलेले नाही. याउलट, मराठा समाजाला आरक्षण नको... असेही कोण बोलत नाही. पण, कधी ओबीसी...कधी मराठा व्यासपीठावर जावून समाजात तेढ निर्माण होईल, अशी भडकावू भाषणे करायची. त्यामुळे राज्यातील सामाजिक सलोखा धोक्यात आला आहे. मराठा आरक्षण हा गरजवंत मराठ्यांचा लढा आहे. शिक्षण आणि नोकरीत आरक्षण मिळाले पाहिजे. ते करीत असताना जातीय तेढ निर्माण करुन आरक्षणाच्या लढ्याचा विचका करण्याचा प्रयत्न कोणीही करु नये, अशी भूमिका होती. ती ठामपणे सभागृहात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड..
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# त्रिवेणीनगर-तळवडे रस्ता 'मृत्यूचा सापळा'!

## » पोलिसांचे संख्याबळ वाढवा : माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांची मागणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**त्रिवेणीनगर ते तळवडे रोड या रस्त्यावर होणारे वारंवार अपघात तसेच वाहतूक विभागातील पोलीस व वार्डन यांची असलेली अपुरी संख्या वाढवण्याची मागणी माजी नगरसेवक शांताराम बापू भालेकर व तळवडे, रुपीनगर, त्रिवेणीनगर भागातील ग्रामस्थ यांच्यावतीने पिंपरी-चिंचवड, पोलीस आयुक्त मा. विनयकुमार चौबे साहेब यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच तळवडे गावाचा जो भाग देहूरोड पोलीस स्टेशनला जोडलेला आहे, तो भाग चिखली पोलीस स्टेशनला जोडण्यात यावा, या मागणीचे निवेदन देण्यात आले.**



याच आठवड्यात वृषाली बाजीराव भालेकर तसेच ताथवडे येथील रहिवासी नवनाथ भानुदास गायकवाड यांना जीव गमवावा लागला. त्याचप्रमाणे एक अनोळखी व्यक्ती हॉस्पिटलमध्ये दाखल असून, कोमामध्ये उपचार घेत आहे. त्या रोडवरील वाहतूक सुरळीत व्हावी, यासाठी वाहतूक पोलीस व वार्डन जास्त प्रमाणात उपलब्ध करून द्यावेत, अशा प्रकारची मागणी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली, असून, त्यांनी लवकरात-लवकर सक्षम असे वाहतूक पोलीस व अनुभवी वार्डन देण्याचे मान्य केले. तसेच मा.आयुक्त साहेब ज्या कालावधीमध्ये ट्रॅफिकची वर्दळ जास्त असते त्यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांनी कुठल्याही प्रकारच्या पावत्या न करता वाहतूक सुरळीत करण्यासाठी मदत करावी, अशा प्रकारच्या सूचना वाहतूक विभागाचे पी.आय. सुनील टोणपे यांना देण्यात आल्या. लवकरच त्या संदर्भात कार्यवाही केली जाईल, अशा प्रकारचे आश्वासन पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी नगरसेवक शांताराम बापू भालेकर व त्यांच्या समवेत असणाऱ्या शिष्टमंडळाला देण्यात आले.

त्याचप्रमाणे तळवडे विभागाचा जो भाग देहूरोड पोलीस स्टेशनच्या हद्दीत आहे, तो भाग डी.सी.पी. काकासाहेब डोळे यांना कायदेशीर बाबींची पूर्तता करून तो भाग चिखली पोलीस स्टेशनला जोडण्यात यावा, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या ही मागणी तळवडे गावचे युवा नेते अमोल भालेकर यांच्याद्वारे करण्यात आली होती. त्याचप्रमाणे रुपीनगर त्रिवेणीनगर-तळवडे या विभागातील वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी प्रस्तावित रस्ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याशी चर्चा करून विकसित करावे, अशा प्रकारच्या सूचना रुपीनगर भागातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अरुणदादा थोपटे यांच्यामार्फत मागणी करण्यात आली.

त्याचप्रमाणे तळवडे-त्रिवेणीनगर-रुपीनगर परिसरामध्ये गेल्या आठ-दहा दिवसांमध्ये 22 ते 25 जण अपघातामुळे मृत्युमुखी पडल्या कारणाने या भागातील बहुजन समाजाचे ज्येष्ठ नेते के.डी. वाघमारे स्वतःची नात ज्योतिबानगर येथील कंपनीत लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडल्याचे दुःख व्यक्त केले. यावेळी तळवडे वाहतूक विभागाचे पी.आय.सुनिल टोणपे, त्याचप्रमाणे निगडी वाहतूक विभागाचे पी.आय. शंकर बाबर, ए.सी.पी. सतीश कसबे उपस्थित होते. याप्रसंगी निवेदन देण्यासाठी तळवडे-रुपीनगर-त्रिवेणीनगर भागातील सर्व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

> त्रिवेणीनगर-तळवडे हा रोड आयटी पार्क, छोटे लघुउद्योग या परिसरातील ग्रामस्थ निघोजे MIDC, आंबी MIDC, चाकण MIDC, शिंदे-वासोली MIDC या विभागांना जोडला गेल्या असल्या कारणाने वाहतुकीची वर्दळ त्रिवेणीनगर-तळवडे रोड वरती मोठ्या प्रमाणात असल्याकारणाने त्या रोडवरती वारंवार अपघात होऊन अनेकांचे बळी गेलेले आहेत. वाहतूक विभागातील पोलीस व वार्डन यांच्या अपुऱ्या संख्येमुळे हे अपघात वाढताहेत. तसेच वाहतूक कोंडीचादेखील त्रास वाहनचालकांना सहन करावा लागतोय. परिणामी वाहन धारकांना मनस्ताप होतोय. पोलिस आयुक्तांना विनंती केली आहे की, या परिसरात वाहतूक पोलिसांची संख्या वाढवावी. त्यामुळे वाहतूक कोंडीला आळा बसेल व अपघातदेखील होणार नाहीत.
>
> **- शांताराम बापू भालेकर, माजी नगरसेवक**




# स्टारबक्सवर बहिष्कार घालून युद्ध थांबेल?

**इस्रायल- पॅलेस्टाइन संघर्षाच्या पार्श्वभूमीवर मॅकडोनाल्ड्सची आउटलेट्स ओस पडल्याची छायाचित्रे व्हायरल होत आहेत. रोज कोणत्यातरी नव्या ब्रँडच्या जाहिरातींवरून वाद गाजत आहेत आणि बहिष्काराचे हॅशटॅग ट्रेण्ड होत आहेत. ग्राहकराजा आपल्या खिशातले मत कोणत्या तरी एका पारड्यात टाकून युद्धाची दिशा बदलू पाहत आहेत.**

या पार्श्वभूमीवर बहिष्कारामागची कारणे आणि त्याचे परिणाम जाणून घेणे, बहिष्काराचा उद्देश साध्य होतो का, कंपन्यांवर येणाऱ्या दबावामुळे देश त्यांची धोरणे बदलतात का हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. युद्धामुळे दरवेळी ब्रँड्सना फटकाच बसतो असेही नाही. युद्धातून काही ब्रँड्सना अच्छे दिन आल्याचीही उदाहरणे आहेत. काही ब्रँड्सचा तर जन्मच युद्धामुळे झाला आहे. युद्ध आणि ब्रँड्सच्या परस्पर संबंधांचा प्रवास विचारप्रवृत्त करणारा आहे... युद्धविषयक भूमिकेचा सर्वांत मोठा फटका बसलेला ब्रँड म्हणजे स्टारबक्स. या कंपनीच्या कामगार संघटनेने पॅलेस्टाइनला पाठिंब दर्शविणारे ट्विट केले आणि कंपनीने संघटनेविरोधात खटला दाखल केला. याचे पडसाद जगभर उमटले आणि बॉयकॉट स्टारबक्स हा हॅशटॅग ट्रेण्ड होऊ लागला. या बहिष्काराचा कंपनीला




मोठा आर्थिक फटका बसला. सलग १२ सत्रांत स्टारबक्सचे समभाग गडगडले. कंपनी लिस्ट झाल्यापासून प्रथमच सलग एवढा प्रदीर्घकाळ ही घसरण कायम राहिली. १९ दिवसांत समभागांचे मूल्य ८.९६ टक्क्यांनी घटले, तर कंपनीचे एकूण मूल्य तब्बल ९.४ टक्क्यांनी घसरले. युद्ध सुरू झाल्यानंतर काही दिवसांत मॅकडोनाल्ड्सच्या इस्रायलमधील फ्रंचायझीने पॅलेस्टाइनमध्ये लढा देणाऱ्य शेकडो जवानांना मोफत जेवण देण्याची घोषणा केली आणि ती मॅकडोनाल्ड्स ब्रँडला प्रचंड महागात पडली. लेबनॉन, सौदी अरेबिया, टर्की, मोरोक्को, मलेशिया, जॉर्डनमध्ये याचे तीव्र पडसाद उमटले. एरवी ग्राहकांनी ओसंडून वाहणारी रेस्टॉरन्ट्स ओस पडली. या तोट्यातून बाहेर पडण्यासाठी आणि ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी काही इस्लामबहुल देशांत मॅकडोनाल्ड्सच्या अनेक पदार्थांवर सवलत देण्यात येत आहे. मॅक फ्लरी, आइस्क्रीम कोन, काही सॉफ्ट ड्रिंक्स, चिकन नगेट्स सारख्या पदार्थांवर ५० ते तब्बल ३५० रुपयांपर्यंतची (भारतीय चलनात) सूट देण्यात येत आहे. लझ्युरी फॅशन ब्रँड डिओरने नोव्हेंबरमध्ये एक हॉलिडे कॅम्पेन केले. डिओरची ब्रँड ॲम्बेसिडर सुपर मॉडेल बेला हदिद होती. मात्र कॅम्पेनमध्ये इस्रायली मॉडेल मे टॅगरचा चेहरा झळकला आणि समाजमाध्यमांत डिओरवर येथेच्छ टीका होऊ लागली. बेला हदिदचे वडील पॅलेस्टिनी आहेत. त्यामुळे तिने समाजमाध्यमांवर पॅलेस्टाइनला ठामपणे पाठिंबा दिला होता. त्यानंतर आलेल्या या कॅम्पेनमध्ये तिच्याऐवजी इस्रायली मॉडेल दिसल्यामुळे डिओर इस्रायल समर्थक असल्याचा दावा करत अनेकांनी या ब्रँडवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले. यावर डिओरचे स्पष्टीकरण असे की, बेला हदिदशी झालेला करार संपुष्टात आला होता आणि याआधीही मे टॅगरने या ब्रँडसाठी हॉलिडे कॅम्पेन्स केली होती. त्यामुळे या कॅम्पेनचा युद्धाशी काहीही संबंध नाही. मात्र व्हायचे ते नुकसान झालेच. डिओर प्रमाणेच जारा या क्लोदिंग ब्रँडचेही ॲड कॅम्पेन वादात सापडले होते. त्यात हात किंवा पाय मोडलेल्या आणि पांढऱ्या वस्त्रात गुंडाळलेल्या मॅनिक्विन्सचा वापर करण्यात आला होता. या जाहिराती जाराच्या संकेतस्थळावर आणि ॲपवर अपलोड करण्यात येताच टीकेची झोड उठली. ही दृश्ये गाझापट्टीतील हिंसाचाराची खिल्ली उडविणारी असल्याच्या प्रतिक्रिया उमटल्या. इन्स्टाग्रामवर बॉयकॉट जारा हा हॅशटॅग ट्रेण्ड होऊ लागला आणि त्यानंतर जाराने दिलगिरी व्यक्त करत, या जाहिराती डीलिट केल्या. जाहिरातींचे चित्रिकरण युद्ध सुरू होण्यापूर्वीच झाले होते, त्यामुळे त्यांचा पॅलेस्टाईनशी काहीही संबंध नाही, असे स्पष्टीकरण जाराने दिले. या लझ्युरी ब्रँडने ख्रिसमिसनिमित्त केलेल्या जाहिरातीत कागदी टोप्या (सान्ताक्लॉज कॅप) जळतानाचे दृष्य होते. या टोप्यांची रंगसंगती पॅलेस्टाइनच्या राष्ट्रध्वजाशी मिळती जुळती असल्याने ही जाहिरात पॅलेस्टाइनविरोधी असल्याची टीका झाली.

## संपादकीय »

### जीवाश्मांच्या जिवावर..

***या टप्प्यावर अचानक जीवाश्म इंधनांची वाट बदलून पर्यायी मार्गावर सुरुवात करणे शक्य नाही, हे ठीक. परंतु तसे भान आपल्याकडे धोरणकर्त्यांनी राखले पाहिजे.***

दुबई म्हणजेच संयुक्त अरब अमिरातीसारख्या तेल उत्पादक देशाच्या भूमीवर पर्यावरणदृष्ट्या अत्यंत कळीची 'सीओपी-ट्वेंटी एट' परिषद भरवली जाणे आणि तिच्या माध्यमातून एखादा बऱ्यापैकी सर्वमान्य तोडगा प्रसृत होणे हा आश्वासक विरोधाभासच. जवळपास दोन आठवड्यांची ही परिषद वातावरण बदल आणि हवामानाशी संबंधित आणखी एक अपयशी परिषद ठरू पाहात होती. पण परिषदेचे अध्यक्ष आणि संयुक्त अरब अमिरातींच्या सर्वात मोठया तेल कंपनीचे प्रमुख सुल्तान अल जबेर यांनी पुढाकार घेऊन, अंतिम मसुद्यातला मजकूर काहीसा बदलला आणि या बदलास बहुतेक देश राजी झाले. हा आणखी एक विरोधाभास! त्यामुळे अंतिम मसुदाही मंजूर झाला. या मसुद्यानुसार, जीवाश्म इंधनांचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करून ऊर्जेची गरज इतर 'अधिक स्वच्छ' इंधनस्रोतांच्या माध्यमातून भागवण्याविषयी मतैक्य झाले.

**नरेंद्र मोदी हे केवळ चतुर राजकारणी नसून ते नशीबवानही आहेत, असे संविधानातील अनुच्छेद ३७० रद्द करण्याच्या सत्ताधारी भाजपच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे अनेकांना वाटले असेल. आधीच तीन राज्यांच्या निवडणुकीतील यश, त्यात हा निकाल, यामुळे त्यांच्या अभूतपूर्व यशाला आगळी खुमारी आली.**

# मोदींसाठी जरा अनाहूत सल्ला..!

हे साऱ्यांनी पाहिले आहे. त्या यशानंतरही केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी तीन राज्यांसाठी मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार निवडले, त्यातून जातीपातींचा समतोल दिसून येतो. छत्तीसगड या राज्याची ३२ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे, तेथे भाजपने आदिवासी मुख्यमंत्री दिले. मध्य प्रदेशातील ओबीसी चेहरा आहेत, तर राजस्थानात ब्राह्मण जातीकडे मुख्यमंत्रीपद बऱ्याच काळाने गेले आहे. पुन्हा उपमुख्यमंत्री पदे ठरवताना जातीपातींचा समतोलाचा आणखी सखोल विचार भाजपने केलेला दिसतो. हे सारे काँग्रेसला जमले नसते. अशा वेळी मोदींच्या लोकप्रियतेचा आलेख कधी घसरत नाही, यात नवल नाही. देश म्हणून मात्र आजही अमेरिका (यूएसए) हाच शक्तिशाली आहे. त्या देशाने भारत सरकारच्या एका अधिकाऱ्यावर तेथील न्यायालयात हजर राहण्यासाठी भारत सरकारकडे मागणी करावी, हे आपल्या सत्ताधाऱ्यांना अडचणीचे ठरणारे आहे. पण हा अडथळा आता भारतीय सत्ताधाऱ्यांना पार करावा लागेल.



भारताच्या त्या अधिकाऱ्याचे नाव अमेरिकी तपास यंत्रणांनी पकडलेल्या निखिल गुप्ता याने घेतलेले आहे- ते उघड न करण्याचा संयम अमेरिकी यंत्रणांनीही दाखवला आहे. या निखिल गुप्तावर गुजरातमध्ये अंमली पदार्थ तस्करीचा गुन्हा दाखल झालेला असूनही तो अमेरिकेत पोहोचला आणि तेथे अमेरिकी नागरिक म्हणून राहणारा खलिस्तानी फुटिरतावाद्यांचा एक म्होरक्या गुरपतवंतसिग पन्नू याला ठार करण्याच्या कटासंदर्भात पकडला गेला. गुप्ता तसेच नाव न जाहीर झालेला भारतीय अधिकारी यांच्यावर, अमेरिकेच्या भूमीत अमेरिकी नागरिकाचा जीव धोक्यात आणल्यासंदर्भात अमेरिकी यंत्रणांकडून सध्या खटला गुदरण्याची कारवाई सुरू आहे. यातून असे दिसते की, परक्या देशातील एखाद्या कुख्यात गुन्हेगाराला संपवण्याचे काम करण्यासाठी अमेरिकेसारखा शक्तिशाली देशच हवा. बराक ओबामा हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असतानाच्या काळात ओसामा बिन लादेनला संपवण्यासाठी कशी बिनबोभाट मोहीम आखून पारही पाडली गेली, याचे तपशील नंतर चित्रवाणीवरून समजले होते. लादेन हा अल-काइदा या दहशतवादी गटाचा म्होरक्या, त्याला पाकिस्तानात दडवून ठेवण्यात 'आयएसआय' या पाकिस्तानी गुप्तहेर संस्थेचाच हात होता. तरीही ती मोहीम अमेरिकेने यशस्वी केली, याचे कारण अमेरिका तेव्हाही क्रमांक एकचा शक्तिशाली देश होता. एकंदरीत अशा मोहिमा शक्तिशाली देशांपैकी पहिल्या वा दुसऱ्या क्रमांकाच्या देशांनीच हाती घ्याव्यात- त्या स्थानापासून दूर असलेल्या देशांनी असल्या मोहिमांचा विचारही करू नये, हे बरे. हा काही माझा उपदेश वगैरे नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अपात्रतेचा निर्णय आणखी लांबणीवर

## विधानसभा अध्यक्षांना 10 जानेवारीपर्यंत मुदत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील सत्तासंघर्षाच्या प्रकरणात आमदार अपात्रतेवर निर्णय घेण्यासाठी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिलेली मुदत सर्वोच्च न्यायालयाने आणखी दहा दिवसांनी वाढवून १० जानेवारी २०२४ पर्यंत दिली आहे. आमदार अपात्रतेचा निर्णय ३१ डिसेंबरपर्यंत देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना याआधी दिले होते. पण, हा निर्णय आता आणखी लांबणीवर पडला आहे.**



सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला, न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने आमदार अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्यासाठी मुदत वाढवून देण्याची मागणी करणारा नार्वेकर यांचा अंतरिम अर्ज मंजूर केला. नार्वेकर यांच्याकडे २ लाखांहून अधिक पानांची कागदपत्रे तपासायची आहेत आणि ते ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू असलेल्या विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनातही कार्यवाही करत आहेत. हिवाळी अधिवेशन २० डिसेंबरपर्यंत चालेल, असे आज शुक्रवारी विधानसभा अध्यक्षांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर सांगितले. नार्वेकर यांनी त्यांच्या अंतरिम अर्जात असे नमूद केले आहे की, हिवाळी अधिवेशन २० डिसेंबरला संपल्यानंतर विधिमंडळ सचिवालयाचे कामकाज नागपूरहून मुंबईला हलवावे लागेल. त्यासाठी सुमारे दोन ते तीन दिवस लागतील. "म्हणून २२ डिसेंबर रोजी अपात्रतेच्या याचिकांची सुनावणी संपली तरीही, अध्यक्ष कागदपत्रांचा अभ्यास करू शकणार नाहीत आणि २६ डिसेंबरपूर्वी निकालांवर काम करू शकणार नाहीत." आमदार अपात्रतेची सुनावणी नागपूरच्या हिवाळी अधिवेशात पूर्ण करण्यात येणार आहे. मात्र अध्यक्षांना विविध कागदपात्रांची तपासणी आणि त्याचा अभ्यास करण्यासाठी अधिकचा वेळ लागणार आहे. यामुळे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी विधानसभा अध्यक्षांच्या वतीने निर्णय देण्यासाठी आणखी वेळ देण्याची विनंती केली होती.

हिवाळी अधिवेशनातही त्यांनी सुनावणी सुरू ठेवली आहे. ही सुनावणी अधिवेशनात १८ ते २० तारखेपर्यंत पूर्ण होईल. मात्र अपात्रतेप्रकरणी शिवसेना शिंदे आणि ठाकरे गटाकडून ३४ याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.

त्यातून २ लाख ६७ हजार पानांचे दस्तावेज जमा करण्यात आले आहेत. निकाल देताना या कागदपत्रांचा अभ्यास करणेही आवश्यक आहे. हे काम उरलेल्या दिवसांत शक्य नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सुनावणीला गती देण्यात आली. दिवाळीत आणि अधिवेशन काळातही ही सुनावणी झाली. राज्यातील सत्तासंघर्षाच्या प्रकरणात आमदार अपात्रतेवर निर्णय घेण्यासाठी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिलेली मुदत सर्वोच्च न्यायालयाने आणखी दहा दिवसांनी वाढवून १० जानेवारी २०२४ पर्यंत दिली आहे. आमदार अपात्रतेचा निर्णय ३१ डिसेंबरपर्यंत देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना याआधी दिले होते. पण, हा निर्णय आता आणखी लांबणीवर पडला आहे.

### 26 डिसेंबरपूर्वी निकालांवर काम करू

» आमदार अपात्रतेवर निर्णय घेण्यासाठी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिलेली मुदत सर्वोच्च न्यायालयाने आणखी दहा दिवसांनी वाढवून १० जानेवारी २०२४ पर्यंत दिली आहे. आमदार अपात्रतेचा निर्णय ३१ डिसेंबरपर्यंत देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना याआधी दिले होते. पण, हा निर्णय आता आणखी लांबणीवर पडला आहे. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला, न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने आमदार अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्यासाठी मुदत वाढवून देण्याची मागणी करणारा नार्वेकर यांचा अंतरिम अर्ज मंजूर केला. नार्वेकर यांच्याकडे २ लाखांहून अधिक पानांची कागदपत्रे तपासायची आहेत आणि ते ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू असलेल्या विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनातही कार्यवाही करत आहेत. हिवाळी अधिवेशन २० डिसेंबरपर्यंत चालेल, असे आज शुक्रवारी विधानसभा अध्यक्षांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर सांगितले. नार्वेकर यांनी त्यांच्या अंतरिम अर्जात असे नमूद केले आहे की, हिवाळी अधिवेशन २० डिसेंबरला संपल्यानंतर विधिमंडळ सचिवालयाचे कामकाज नागपूरहून मुंबईला हलवावे लागेल. त्यासाठी सुमारे दोन ते तीन दिवस लागतील. "म्हणून २२ डिसेंबर रोजी अपात्रतेच्या याचिकांची सुनावणी संपली तरीही, अध्यक्ष कागदपत्रांचा अभ्यास करू शकणार नाहीत आणि २६ डिसेंबरपूर्वी निकालांवर काम करू शकणार नाहीत.

# देवेंद्र फडणवीस-जयंत पाटील यांच्यात खडाजंगी!

## पोलिसांनी हवेत गोळीबार करुन जरब का बसवली नाही?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीड आणि माजलगाव या ठिकाणी जी जाळपोळ झाली त्यावरुन आज देवेंद्र फडणवीस आणि जयंत पाटील यांच्यात विधानसभेत खडाजंगी झाल्याचं पाहण्यास मिळालं. हल्लेखोरांनी सीसीटीव्ही फोडले गेले देवेंद्र फडणवीस यांनी निवेदनात सांगितलं. दंगल करणाऱ्यांची संख्या आणि त्यांच्या तुलनेत पोलिसांची संख्या कमी होती. हे सगळं पूर्वनियोजित होतं का? तेदेखील आम्ही तपासतो आहोत.**

काही लोक फरार आहेत. त्यावेळी मास्टरमाईंडच्या संशयाचं निरसन होईल असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. यामध्ये जो कुणी दोषी आढळेल त्याच्यावर कारवाई होईल हे मी सांगू इच्छितो असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. त्यावर जयंत पाटील यांनी असं म्हटलं आहे की गुप्तचर यंत्रणेला याची माहिती नव्हती हे काही मला खरं वाटत नाही. बीडच्या पोलीस अधीक्षकांना बीड जिल्ह्यात काहीतरी होऊ शकतं अशी वॉर्निंग होती. त्यांना हे कळवण्यात आलं होतं. त्यामुळे त्यांच्याकडून हलगर्जीपणा झाला. सकाळी माजलगावला जाऊन प्रकाश सोळंकींच्या घराला आग लावली गेली. त्यावेळी तिथे फुटेजमध्ये पोलीस दिसत आहेत. बीड शहर जळत असताना



जिल्हा पोलीस अधीक्षक बीडला आले नाहीत. पोलीस कमी होते हे जे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं त्यावर मी हे सांगेन की पोलीस लोकसंख्येच्या तुलनेत कमीच असतात. त्याना जरब बसण्यासाठी हवेत गोळीबार का केला नाही? पोलीस ५० च असतात ५ हजारचा मॉब असला तरीही. पोलिसांनी हवेत गोळीबार करुन जरब का बसवली नाही? राष्ट्रवादी काँग्रेसचं कार्यालय जाळण्यात आलं. जयदत्त क्षीरसागर, सोळंकी यांची घरं जाळली. शहरात जमाव फिरत होता. नंबर दिले गेलेले होते आणि सगळे फिरत होते. शहरात गर्दीचा जमाव फिरत होते. तरीही विधानसभेच्या सदस्यांना आपण देऊ शकलो नाही तर लोकांची गोष्टच येत नाही. माझा प्रश्न आहे की गोपनीय शाखेला ही माहिती होती. संपूर्ण माहिती होती, मी स्वतः सात ते आठवेळा फोन केला त्यांनी फोन घेतला नाही. संदीप क्षीरसागर यांच्या घरात मुलं आणि त्यांची पत्नी होती. त्यासाठी फोन करत होतो. पालकमंत्र्यांनी एसआयटी स्थापन करण्याची मागणी केली तरीही ती स्थापन झालेली नाही. याचं कारण काय आहे याचं उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिलं पाहिजे.

### आंतरवाली सराटीला गृहमंत्री का गेले नाहीत?

» आंतरवाली सराटीला लाठीचार्ज झाला त्याची न्यायालयीन चौकशी करा ही मागणीही करण्यात आली होती. मॉब फिरत होता तर फायरिंग केलं असतं तर तो जमाव पांगला असता. पप्पू शिंदे नावाचा एक कॉ ओर्डिनेटर आहे. तो एका राजकीय पक्षाच्या नेत्याचा भाचा आहे. पप्पू शिंदे आणि त्याच्या बरोबरची गँग हे सगळं घडवत होती. छगन भुजबळ यांनी व्यक्त केलेली भावना योग्यच आहे. राज्याच्या मंत्रिमंडळातले छगन भुजबळ गेले पण गृहमंत्री का गेले नाहीत? बैठक झाली तेव्हा त्यात काय झालं?

# सुरक्षाभंगाचे दोन्ही सभागृहांत तीव्र पडसाद

## विरोधकांवर कारवाई; 14 खासदारांचे निलंबन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नव्या संसद भवनातील सुरक्षाभंगाच्या गंभीर घटनेचे तीव्र पडसाद गुरुवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये उमटले. सुरक्षेतील त्रुटींसंदर्भात सविस्तर स्पष्टीकरणाच्या विरोधकांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देण्याऐवजी १४ विरोधी खासदारांना अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्यात आले. शिवाय, संसदेत पूर्वी झालेल्या सुरक्षाभंगाच्या घटनांची यादी वाचून दाखवत केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी विरोधकांनी राजकारण करू नये असा 'उपदेश' केला, लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी केंद्र सरकारचा हिरिरीने बचाव केला.**



लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभागृहात उपस्थित राहण्याची, तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सभागृहात निवेदन करण्याची मागणी लावून धरली, मात्र शहा न आल्याने विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. त्यावर, लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी, "संसद आणि तिची सुरक्षा लोकसभा सचिवालयाच्या अखत्यारीत आहे. सचिवालयाच्या अधिकारक्षेत्रात केंद्र सरकारला हस्तक्षेप करू दिला जाणार नाही," अशी भूमिका घेतली. बिर्लांच्या या विधानामुळे विरोधक आणखी संतप्त झाले. दोन्ही सदनांमधील विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे सभागृहांचे कामकाज दोन वेळा तहकूब करण्यात आले. संसदेच्या नव्या इमारतीमधील लोकसभेच्या सभागृहामध्ये प्रेक्षक दालनातून बुधवारी दोन तरुणांनी उडी मारली आणि धुराच्या नळकांड्या फोडून दरुगधीयुक्त पिवळा वायू सोडल्यामुळे खासदारांमध्ये घबराट पसरली होती. संसदेच्या सुरक्षा यंत्रणांतील गंभीर त्रुटीवरून गुरुवारी सकाळी संसदेच्या दोन्ही सदनांमध्ये विरोधकांनी केंद्र सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. लोकसभेत काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसच्या सदस्यांनी प्रचंड गदारोळ केला. 'मोदी सदन में आओ, शहा शरम करो', अशी घोषणाबाजी विरोधकांनी केली. राज्यसभेतही तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओब्रायन यांनी सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत जाऊन संसद सुरक्षाभंगाच्या घटनेवर चर्चेची मागणी केली, मात्र सभापती जगदीश धनखड यांनी, डेरेक यांच्यावर असभ्य वर्तन केल्याच्या कारणावरून निलंबनाची कारवाई केली. लोकसभेचे काजकाज दुपारी २ वाजता सुरू होताच, संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी काँग्रेसचे टी. एन. प्रतापन, हिबी ईडन, एस. ज्योतिमणी, राम्या हरिदास आणि डीन कुरियाकोस यांना अपमानजनक वर्तन केल्याचे कारण देत निलंबित करण्याचा प्रस्ताव आणला, तो आवाजी मतदानाने मंजूर झाला. लोकसभेत सकाळच्या सत्रामध्ये गोंधळ कमालीचा वाढल्यामुळे केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना हस्तक्षेप करावा लागला. लोकसभेत बुधवारी घडलेली घटना गंभीर तसेच दुर्दैवी आहे. या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश लोकसभाध्यक्षांनी दिले आहेत. त्यामुळे विरोधकांनी सहकार्य करावे, असे आवाहन राजनाथ यांनी केले. तसेच त्यांनी लोकसभेमध्ये सर्वपक्षीय खासदारांना अप्रत्यक्षपणे कानपिचक्या दिल्या. आपण कोणाला प्रवेशिका देतो यासंदर्भात सर्व खासदारांनी दक्षता बाळगली पाहिजे, असे ते म्हणाले मात्र त्यांनी केंद्र सरकारच्या स्पष्टीकरणावर मौन बाळगले. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी बुधवारी तातडीने सर्वपक्षीय गटनेत्यांची बैठक घेतली होती आणि केंद्रीय गृहमंत्रालयाला पत्र पाठवून सुरक्षेसंदर्भात चौकशीचा आदेश दिला होता. त्याची दखल घेत केंद्रीय गृहमंत्रालयानेही उच्चस्तरीय चौकशी सुरू केली. लोकसभेत बिर्ला यांनी, "आम्ही तुम्हा सर्वांशी यावर चर्चा करू. सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी आणि कार्यकक्षा लोकसभा सचिवालयाकडे आहे. त्यामुळे सचिवालय तुमच्याशी बोलेल," असे सांगत शहांनी निवेदन करण्याची विरोधकांची मागणी फेटाळली.

### विरोधक आक्रमक

खासदारांच्या निलंबनावरून विरोधी खासदारांनी भाजपवर टीकास्त्र सोडले. "लोकसभेच्या सुरक्षाभंगाची घटना ही राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहे. त्यामुळे हा मुद्दा सभागृहात मांडणे विरोधी पक्षांचे कर्तव्य होते. गृहमंत्र्यांनी सभागृहात निवेदन केले असते तर सभागृहात गोंधळाची स्थिती उद्भवली नसती. सभापतींच्या आसनासमोर जाऊन घोषणाबाजी केली म्हणून ओब्रायन यांना निलंबित केले आहे. मोदी है तो मुमकिन है," अशी टीका तृणमूलच्या खासदार डोला सेन यांनी केली.

# मशिदीच्या सर्वेक्षणास स्थगिती नाहीच

## हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मथुरेतल्या शाही ईदगाह मशिदीचं वैज्ञानिक सर्वेक्षण केलं जाणार आहे. शाही ईदगाह मशीद ही कृष्ण जन्मभूमीवर उभारण्यात आली आहे असा दावा करत हिंदू संघटनांनी केला आहे. तसेच या मशीद परिसराचं वैज्ञानिक सर्वेक्षण करण्याची मागणी करणारी याचिकाही त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायायात दाखल केली होती. यावर निकाल देताना न्यायालयाने वैज्ञानिक सर्वेक्षणास परवानगी दिली. आधी मथुरा न्यायालयाने याप्रकरणी सर्वेक्षणास परवानगी होती.**



आज सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने मशिदीच्या वैज्ञानिक सर्वेक्षणास स्थगिती दिली नाही. शाही ईदगाह मशीद परिसराचं न्यायालयाच्या देखरेखीखाली अधिवक्ते आणि आयुक्तांच्या तीन सदस्यीय पथकाकडून प्राथमिक सर्वेक्षण केलं जाईल. आयुक्तांसह या सर्वेक्षणात किती लोक सहभागी होतील? सर्वेक्षण कधी सुरू केलं जाईल? मशीद परिसरातील कोणकोणत्या भागांचं सर्वेक्षण केलं जाईल? याबाबतचा निर्णय १८ डिसेंबर रोजी घेतला जाईल. भगवान श्री कृष्ण विराजमान ट्रस्ट आणि इतर सात जणांनी विधीज्ञ हरी शंकर जैन, विष्णू शंकर जैन, प्रभाष पांडे आणि देवकी नंदन यांच्या माध्यमातून अलाहाबाद उच्च न्यायालयात मशिदीच्या वैज्ञानिक सर्वेक्षणाची मागणी करणाऱ्या याचिका दाखल केल्या होत्या. हिंदू संघटनांनी म्हटलं आहे की, ही भूमी (शाही ईदगाह मशीद असलेली जागा) भगवान श्रीकृष्णाचं जन्मस्थान आहे. येथे पूर्वी श्रीकृष्णाचं भव्य मंदिर होतं. मुघल बादशाह औरंगजेबाच्या आदेशानंतर मुघलांनी हे मंदिर पाडून तिथे मशीद बांधली. शाही ईदगाह मशिदीच्या सर्वेक्षणाआधी वाराणसीतल्या ज्ञानवापी मशीद परिसराचं एएसआय सर्वेक्षण करण्यात आलं होतं. न्यायालयाने नियुक्त केलेल्या आयुक्तांच्या देखरेखीखालीच हेदेखील सर्वेक्षण करण्यात आलं.

# महेंद्र सिंह धोनीवर फिक्सिंगचे आरोप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

भारताचा लोकप्रिय क्रिकेटपटू आणि भारतीय संघाचा माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनी याने मद्रास उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अवमान याचिकेनंतर आयपीएस अधिकारी संपत कुमार यांना १५ दिवसांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. मद्रास उच्च न्यायालयाने हा खळबळजनक निकाल दिला आहे. बार अँड बेंच संकेतस्थळाच्या माहितीनुसार, न्यायमूर्ती एसएस सुंदर आणि न्या. सुंदर मोहन यांच्या खंडपीठाने ही शिक्षा सुनावत असताना संपत कुमार यांना शिक्षेविरोधात अपील करण्याची परवानगी दिली असून त्यासाठी ३० दिवसांची मूदत देऊ केली आहे. धोनीच्या नावाचा उल्लेख केला होता. त्यावरून धोनीने मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय यांच्याविरोधात अवमानास्पद भाष्य केल्यामुळे महेंद्र सिंह धोनीने आयपीएस अधिकारी संपत कुमार यांच्याविरोधात मद्रास उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केली होती. फिक्सिंग प्रकरणात एमएस धोनीचे नाव घेतल्यामुळे २०१४ साली धोनीने तसेच संपत कुमार यांनी माननीय न्यायालयाच्या विरोधात केलेल्या अवमानकारक वक्तव्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाई करावी, अशीही मागणी धोनीने याचिकेच्या माध्यमातून केली होती.

# फायटर सिनेमातील पहिलं गाणं आऊट!

बॉलिवूड अभिनेता हृतिक रोशन (HRITHIK ROSHAN) आणि दीपिका पादुकोण (DEEPIKA PADUKONE) यांचा 'फायटर' (FIGHTER) हा सिनेमा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. लवकरच हा बहुचर्चित सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच आता या सिनेमातील 'शेर खुल गए' (SHER KHUL GAYE) हे पहिलं गाणं आऊट झालं आहे. 'फायटर' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीसाठी सज्ज आहे. या सिनेमात प्रेक्षकांना ॲक्शनचा तडका पाहायला मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी या सिनेमाचा टीझर आऊट झाला होता. टीझरने प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. आता या सिनेमातील 'शेर खुल गए' हे पहिलं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. या गाण्यात हृतिक रोशन (HRITHIK ROSHAN) आणि दीपिका पादुकोण (DEEPIKA PADUKONE) यांची जबरदस्त केमिस्ट्री पाहायला मिळत आहे. 'फायटर' या सिनेमातील 'शेर मिल गए' हे गाणं प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं आहे. 'फायटर' या सिनेमातील 'शेर खुल गए' हे गाणं 15 डिसेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. हृतिक रोशन आणि दीपिका पादुकोण यांचं 'शेर खुल गए' हे गाणं यंदा पार्टीमध्ये वाजणार आहे. या गाण्यातील दोन्ही कलाकारांचे डान्स मूव्ह्स आणि केमिस्ट्रीने प्रेक्षकांना वेड लावलं आहे. 'शेर खुल गए' हे गाणं यंदा सर्व प्ले लिस्टवर राज्य करणार आहे. 'फायटर' सिनेमातील या पहिल्या गाण्याला बेनी दयाल आणि शिल्पा राव यांनी आवाज दिला आहे. तर या गाण्याचे बोल कुमार यांनी लिहिलं आहे. दीपिका पादुकोणचं 'शेर खुल गए' हे गाणं प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं असून प्रेक्षक आता सिनेमाची प्रतीक्षा करत आहेत. 'फायटर' या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सिद्धार्थ आनंदने (SIDDHARTH ANAND) सांभाळली आहे. हृतिक रोशन आणि दीपिका पादुकोण यांचा 'फायटर' हा सिनेमा भारतातील पहिला एरियल ॲक्शनपट आहे. वीएफएक्स शिवाय हा सिनेमा बनवण्यात आला आहे.

'फायटर' या सिनेमात हृतिक रोशन आणि दीपिका पादुकोण मुख्य भूमिकेत आहेत. तर अनिल कपूर, करण सिंह ग्रोवर आणि अक्षय ओबरॉय या सिनेमात महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. 25 जानेवारी 2024 रोजी हा सिनेमा सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. या सिनेमाची प्रेक्षकांना चांगलीच उत्सुकता आहे. 2024 च्या सुरुवातीला प्रेक्षकांना एक धमाकेदार सिनेमाची मेजवानी मिळणार आहे.

## साहिल खानला पोलिसांचे समन्स

अभिनेता साहिल खान (SAHIL KHAN) सध्या चर्चेत आहे. महादेव बेटिंग ॲप प्रकरणी साहिल खानला आज मुंबई पोलिसांचे समन्स पाठवले आहे. मुंबई गुन्हे शाखेचे सायबर सेल याची चौकशी करणार आहेत. साहिल खान अद्याप चौकशीसाठी हजर झालेला नाही. तो येणार की नाही याची अजून खात्री नाही. साहिल खानची एकीकडे चौकशी होणार असल्याचं समोर आलं आहे. पण चौकशीसाठी तो येणार की नाही याची अजून खात्री झालेली नाही. मात्र चौकशीच्या फेऱ्यात असणारा साहिल खान सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असून ट्विटरवर त्याने काही फोटो शेअर केले आहेत. 'गुड मॉर्निंग जुमा मुबारक' असं म्हणत साहिलने ट्विट केलं आहे. अडचणीत असतानाही आपण कसे एन्जॉय करतोय हे सिद्ध करण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. गुन्हे शाखेच्या सायबर सेलकडून तो सध्या कुठे आहे याची माहिती घेतली जात आहे. साहिल खान महादेव बेटिंग ॲप प्रकरणात आरोपी असून सत्र न्यायालयाने त्याचा अटकपूर्व जामीन फेटाळला आहे. माटुंगा पोलीस ठाण्यात खिलाडी ॲप संदर्भात झालेल्या गुन्ह्यात बॉलीवूड अभिनेता साहिल खानचा सहभाग होता.

## अखेर उर्फी जावेदला स्थळ आलं



अभिनेत्री उर्फी जावेद (URFI JAVED) नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. उर्फीसोबत संसार थाटण्याची अनेकांची इच्छा असते. 'बिग बॉस' (BIGG BOSS) फेम पुनीत सुपरस्टारने (PUNEET SUPERSTAR) उर्फीला चक्क लग्नाची मागणी घातली आहे. लग्न करण्यासाठी त्याने उर्फीला हात जोडत विनंती केली आहे. सोशल मीडियावर हा व्हिडीओ चांगलाच व्हायरल होत आहे. 'बिग बॉस'मध्ये पुनीत सुपरस्टारने गोंधळ घातला होता. याच कारणाने त्याला या कार्यक्रमातून बाहेर काढण्यात आलं. अशातच त्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये सध्या तो चर्चेत आहे. पुनीतने उर्फीला लग्नाची मागणी (PUNEET SUPERSTAR PROPOSE URFI JAVED FOR WEDDING) घातली आहे. पुनीत उर्फीला लग्न करण्यासाठी हात जोडत विनंती करत आहे. पुनीत सुपरस्टारचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीमध्ये तो उर्फीला म्हणत आहे की,"उर्फी जावेद यार, माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे. गेल्या अनेक दिवसांपासून माझ्या मनातली एक गोष्ट मला तुला सांगायची आहे. पण कसं सांगावं हे कळत नाही. उर्फी मला तुझ्यासारखी मुलगी जोडीदार म्हणून हवी आहे. मी हात जोडून तुला विनंती करतो कृपया माझ्यासोबत लग्न कर". पुनीत सुपरस्टारचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर उर्फी जावेदनेही (URFI JAVED REACTION ON PUNEET SUPERSTAR PROPOSE) आपली प्रतिक्रिया दिली आहे. पापराझींसोबत बोलताना उर्फी म्हणाली की,"पुनीतसोबत लग्न करणार नाही. पण लव्ह यू टू". उर्फी आणि पुनीतच्या वेडेपणावर नेटकरी हसत आहेत. चांगल्या व्हिडीओ कंटेटसाठीचा हा स्टंट असल्याचं नेटकरी म्हणत आहेत. उर्फी जावेद तिच्या अतरंगी ड्रेसिंगमुळे नेहमीच चर्चेत असते. तर दुसरीकडे पुनीत सुपरस्टार वादग्रस्त वक्तव्यामुळे नेटकऱ्यांचं लक्ष वेधून घेत असतो. त्याच्या याच गोष्टीमुळे 'बिग बॉस'च्या घरातून त्याला बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला होता. पुनीत हा लोकप्रिय सोशल मीडिया इन्फ्लुयंसर आणि युट्यूबर आहे. या व्हिडीमध्ये तो उर्फीला म्हणत आहे की,"उर्फी जावेद यार, माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे. गेल्या अनेक दिवसांपासून माझ्या मनातली एक गोष्ट मला तुला सांगायची आहे. पण कसं सांगावं हे कळत नाही.

## आमिर खान करणार धमाकेदार कमबॅक!

बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खान (AAMIR KHAN) अनेक वर्षांनी रुपेरी पडद्यावर कमबॅक करण्यासाठी सज्ज आहे. अनेक दिवसांपासून तो रुपेरी पडद्यापासून दूर आहे. पण 2024 मध्ये तो धमाकेदार कमबॅक करणार असल्याचं समोर आलं आहे. वर्षाच्या सुरुवातीलाच तो त्याच्या आगामी सिनेमाचं शूटिंग सुरू करणार आहे. आमिर खान अनेक दिवसांपासून सिनेसृष्टीपासून दूर आहे. करीना कपूर (KAREENA KAPOOR) अभिनीत 'लाल सिंह चड्ढा' (LAAL SINGH CHADDHA) या सिनेमात शेवटचा दिसला होता. आमिरचा हा सिनेमा रुपेरी पडद्यावर फ्लॉप ठरला होता. त्यानंतर त्याने सिनेसृष्टीपासून ब्रेक घेण्याचा निर्णय घेतला. 2023 मध्ये आमिरचा एकही सिनेमा प्रदर्शित झाला नाही. आमिरला आता मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. पण आता नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच आणिर खान सिनेसृष्टीत धमाकेदार कमबॅक करणार आहे. मीडिया रिपोर्टनुसार, आमिर खानच्या आगामी सिनेमाचं शूटिंग जानेवारी महिन्यात सुरू होणार आहे. एसआर प्रसन्ना या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळणार आहेत. सध्या या सिनेमाच्या प्री-प्रोडक्शनचं काम सुरू आहे. प्री-प्रोडक्शनचं काम पूर्ण झाल्यानंतर निर्माते 29 जानेवारीपासून या सिनेमाच्या शूटिंगला सुरुवात करू शकतात. मुंबईत या सिनेमाच्या शूटचं पहिलं शेड्यूल पार पडणार आहे. आमिर खानचा आगामी सिनेमा हा 2018 मध्ये आलेला स्पॅनिश सिनेमा 'कैम्पियन्स'चा रिमेक आहे. प्रसन्ना गेल्या अनेक दिवसांपासून या सिनेमाच्या संहितेवर काम करत आहे. आमिर खानदेखील या सिनेमासाठी खूप उत्सुक आहे. एका रागिट प्रशिक्षकावर आधारित हा सिनेमा आहे.

## दीपिका पादुकोणला आवडायचा विन डीजल



बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण (DEEPIKA PADUKONE) ही बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री आहे. बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये दीपिका पादुकोणचा समावेश होतो. दीपिकाचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये दीपिका म्हणत आहे की,"हॉलिवूड अभिनेता विन डीजलच्या (HOLLYWOOD ACTOR VIN DIESEL) मुलाची आई होण्याची माझी इच्छा होती". दीपिका पादुकोणचा एक जुना व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये ती बॉलिवूड अभिनेता विन डीजलसोबत (VIN DIESEL) दिसत आहे. एका चॅट शोमध्ये ते त्यांच्या सिनेमाचं प्रमोशन करताना दिसत आहेत. दरम्यान त्यांनी सिनेमांसह वेगवेगळ्या गोष्टींवर भाष्य केलं. दीपिकाने त्यावेळी विन तिला आवडत असल्याचं सांगितलं होतं. 'द एलेन डिजेनर्स शो' या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात दीपिका पादुकोणने हजेरी लावली होती. त्यावेळी तिने विन डीजलबद्दल एक धक्कादायक वक्तव्य केलं होतं. अभिनेत्री म्हणाली होती की,"मी विन डीजलची मोठी चाहती असून त्याच्या मुलाची आई होण्याचाही मी विचार केला होता". दीपिकाचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. नेटकऱ्यांनी दीपिकाला ट्रोल करायला सुरुवात केली आहे. दीपिकाने विनबद्दल भाष्य केलं तेव्हा तिचा अभिनेता रणवीर सिंहसोबत (RANVEER SINGH) साखरपुडा झाला होता. रणवीरसोबत साखरपुडा झाल्यानंतर दुसरा कोणाचा विचार कशी करू शकते यावरुन नेटकऱ्यांनी दीपिकाला प्रचंड ट्रोल केलं होतं. दीपिकाच्या या वक्तव्याने रणवीरचे चाहते मात्र नाराज झाले होते.

# इंग्लंडचा अवघ्या 136 धावांत खुर्दा!

## » टीम इंडियाच्या गोलंदाजांची चमकदार कामगिरी

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**महिला क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्यात नवी मुंबईत कसोटी सामना खेळला जात आहे. शुक्रवारी दुसऱ्या दिवशी इंग्लंडचा संघ पहिल्या डावात 136 धावांवर गडगडला. नवी मुंबईतील डी. वायय पाटील स्टेडियमवर टीम इंडियाच्या गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. दीप्ती शर्माने 5 बळी घेतले. स्नेह राणाला 2 बळी मिळाले. इंग्लंडकडून नॅट सायव्हर ब्रंटने अर्धशतक झळकावले. भारताच्या पहिल्या डावानंतर ब्युमॉंट आणि डंकली सलामीला आल्या. डंकली जास्त वेळ क्रीजवर टिकू शकला नाही. 10 चेंडूत 2 चौकारांच्या मदतीने 11 धावा करून ती बाद झाली. रेणुका सिंहने तिला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. 35 चेंडूत 10 धावा करून ब्युमॉंट बाद झाली. कर्णधार हीदर नाईटलाही विशेष काही करता आले नाही. 23 चेंडूत 11 धावा करून ती बाद झाली. पूजा वस्त्राकरने नाइटला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.**



नॅट सायव्हरने चांगली फलंदाजी करत अर्धशतक झळकावले. तिनं 70 चेंडूंचा सामना करत 59 धावा केल्या. सायव्हरच्या या खेळीत 10 चौकारांचा समावेश होता. तिला स्नेह राणाने बाद केले. डेनियल व्याट 19 धावा करून बाद झाली. दीप्ती शर्माने तिला बाद केले. दीप्तीने यष्टिरक्षक फलंदाज ॲमी जोन्सलाही पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. जोन्स 12 धावा करून बाद झाली. अशाप्रकारे संपूर्ण संघ 136 धावांवर गडगडला. इंग्लंडचा संघ केवळ 35.3 षटकेच खेळू शकला. टीम इंडियाकडून गोलंदाजी करताना दीप्ती शर्माने 5 बळी घेतले. त्याने 5.3 षटकात फक्त 7 धावा देत 4 मेडन षटके टाकली. स्नेह राणाने 6 षटकात 25 धावा देत 2 बळी घेतले. रेणुका आणि पूजा वस्त्राकर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. राजेश्वरी गायकवाडलाएकही यश मिळाले नाही. तिने 6 षटकात 25 धावा दिल्या. दरम्यान, पहिल्या डावात 428 धावा करून टीम इंडिया दुसऱ्या दिवशी ऑलआऊट झाली. दीप्ती शर्मा आणि जेमिमाह रॉड्रिग्जसह चार खेळाडूंनी अर्धशतके झळकावली. हरमनप्रीत कौरचे अर्धशतक हुकले. ती 49 धावांवर बाद झाली. इंग्लंडकडून लॉरेन बेल आणि सोफी एक्लेस्टोनने 3-3 बळी घेतले. सामन्याच्या पहिल्या दिवशी स्मृती मानधना आणि शफाली वर्मा टीम इंडियासाठी सलामीला आल्या. मंधानाने 12 चेंडूंचा सामना करत 17 धावा केल्या. त्याने 3 चौकार मारले. शेफालीने 19 धावा केल्या. शुभा सतीश आणि जेमिमा यांनी चांगली भागीदारी केली. शुभाने 76 चेंडूंचा सामना करत 69 धावा केल्या. तिने 13 चौकार मारले. जेमिमाने 99 चेंडूत 68 धावा केल्या. तिने 11 चौकार मारले. कर्णधार हरमनप्रीतचे अर्धशतक हुकले. ती 49 धावा करून बाद झाली. हरमनप्रीतने 81 चेंडूंचा सामना करत 49 धावा केल्या. यास्तिका भाटियाने 88 चेंडूंचा सामना करत 66 धावा केल्या. दीप्ती शर्मानेही अर्धशतक झळकावले. तिनं 113 चेंडूंचा सामना करत 67 धावा केल्या. स्नेह राणा 30 धावा करून बाद झाली. पूजा वस्त्राकर 10 धावा करून नाबाद राहिली.महिला क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्यात नवी मुंबईत कसोटी सामना खेळला जात आहे. शुक्रवारी दुसऱ्या दिवशी इंग्लंडचा संघ पहिल्या डावात 136 धावांवर गडगडला. नवी मुंबईतील डी. वायय पाटील स्टेडियमवर टीम इंडियाच्या गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. दीप्ती शर्माने 5 बळी घेतले. स्नेह राणाला 2 बळी मिळाले. इंग्लंडकडून नॅट सायव्हर ब्रंटने अर्धशतक झळकावले. भारताच्या पहिल्या डावानंतर ब्युमॉंट आणि डंकली सलामीला आल्या. डंकली जास्त वेळ क्रीजवर टिकू शकला नाही. 10 चेंडूत 2 चौकारांच्या मदतीने 11 धावा करून ती बाद झाली. रेणुका सिंहने तिला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. 35 चेंडूत 10 धावा करून ब्युमॉंट बाद झाली. कर्णधार हीदर नाईटलाही विशेष काही करता आले नाही. 23 चेंडूत 11 धावा करून ती बाद झाली. पूजा वस्त्राकरने नाइटला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. नॅट सायव्हरने चांगली फलंदाजी करत अर्धशतक झळकावले. तिनं 70 चेंडूंचा सामना करत 59 धावा केल्या. सायव्हरच्या या खेळीत 10 चौकारांचा समावेश होता. तिला स्नेह राणाने बाद केले. डेनियल व्याट 19 धावा करून बाद झाली. दीप्ती शर्माने तिला बाद केले. दीप्तीने यष्टिरक्षक फलंदाज ॲमी जोन्सलाही पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. जोन्स 12 धावा करून बाद झाली. अशाप्रकारे संपूर्ण संघ 136 धावांवर गडगडला. इंग्लंडचा संघ केवळ 35.3 षटकेच खेळू शकला.

### दीप्ती शर्माने 5 घेतले बळी

» टीम इंडियाकडून गोलंदाजी करताना दीप्ती शर्माने 5 बळी घेतले. त्याने 5.3 षटकात फक्त 7 धावा देत 4 मेडन षटके टाकली. स्नेह राणाने 6 षटकात 25 धावा देत 2 बळी घेतले. रेणुका आणि पूजा वस्त्राकर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. राजेश्वरी गायकवाडलाएकही यश मिळाले नाही. पहिल्या डावात 428 धावा करून टीम इंडिया दुसऱ्या दिवशी ऑलआऊट झाली. दीप्ती शर्मा आणि जेमिमाह रॉड्रिग्जसह चार खेळाडूंनी अर्धशतके झळकावली.

# सूर्याने चौथ्या क्रमांकावर येत केला भीम पराक्रम!

## » सूर्याने शतकी खेळी करत संघाला विजय मिळवून दिला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-20 मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा 106 धावांनी पराभव केला. या सामन्यात भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने (SURYAKUMAR YADAV) झंझावाती शतक झळकावले. सूर्याची 'प्लेअर ऑफ द मॅच' आणि 'प्लेअर ऑफ द सिरीज' म्हणून निवड झाली.**



या सामन्यात चमकदार कामगिरी करत त्याने रोहित शर्मा (ROHIT SHARMA) आणि हार्दिक पांड्याचे (HARDI PANDYA) विक्रम मोडीत काढले. जोहान्सबर्गमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात टीम इंडियाच्या विजयासह मालिका 1-1 अशी बरोबरीत संपली. कॅप्टन सूर्यकुमार यादवने तिसऱ्या आणि निर्णायक सामन्यात दमदार शतकी खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. सामन्याचा मानकरी तोच ठरला. सूर्याने चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येत अवघ्या 60 सामन्यात 14 वेळा सामनावीर पुरस्कार पटकावला आहे. हिटमॅन रोहितने 148 सामन्यात 12 वेळा, तर किंग कोहलीने 115 सामन्यात 15 वेळा हा मान पटकावला आहे. टीम इंडियासाठी सर्वाधिक वेळा 'प्लेअर ऑफ द सीरीज' जिंकण्याच्या बाबतीत सूर्या दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. या बाबतीत त्याने रोहित शर्मा, भुवनेश्वर कुमार आणि हार्दिक पांड्यासह अनेक खेळाडूंना मागे टाकले आहे. सूर्याने हे विजेतेपद चारवेळा जिंकले आहे. रोहित आणि पांड्याने प्रत्येकी दोनदा हा पुरस्कार पटकावला आहे. भुवनेश्वरने तीन वेळा हे विजेतेपद पटकावले आहे. भारतासाठी टी-20 मध्ये सर्वाधिक वेळा 'प्लेअर ऑफ द सिरीज' जिंकण्याचा पुरस्कार विराट कोहलीच्या नावावर आहे. कोहलीने हे विजेतेपद सातवेळा जिंकले आहे. टीम इंडियाने तिसऱ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना 201 धावा केल्या होत्या. यादरम्यान सूर्याने शतक झळकावले. त्याने 56 चेंडूंचा सामना करत 100 धावा केल्या. सूर्याने या खेळीत 7 चौकार आणि 8 षटकार मारले. सलामीवीर यशस्वी जैस्वालने 41 चेंडूंचा सामना करत 60 धावा केल्या. त्याने 6 चौकार आणि 3 षटकार मारले.

### आफ्रिकेचा संघ 95 धावांवर गडगडला

» भारताने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेला दक्षिण आफ्रिकेचा संघ 95 धावांवर गडगडला. भारताकडून कुलदीप यादवने 5 बळी घेतले. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता. यानंतर दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने 5 विकेट्सने विजय मिळवला.